# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक २९४/२०२४ दिनांक- १२/०८/२०२४.

## "मंदिरातील दानपेटीतील रोख रक्कम चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगारास भाईंदर पोलीस ठाणेकडून अटक"

भाईंदर पोलीस ठाणे येथे दाखल गुन्हा रजि क्र. I १६/२०२४ भा.द.वि.स. कलम ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल असुन गुन्हयाची हकीगत अशी की, यातील फिर्यादी यांनी फिर्याद दिली की **दि.** १५/०१/२०२४ रोजी सकाळी ०९.३० वाजता ते दि. १६/०१/२०२४ रोजी ०७.४५ वाजताचे दरम्यान भाईंदर पश्चिम येथील, ६० फुट रोडचे, अग्रवाल आईस्क्रीम कंपनी जवळील श्री महावीर स्वामी दिगंबर जैन मंदिरात कोणीतरी अज्ञात चोरटयाने परवानगी शिवाय प्रवेश करुन मंदिरातील दानपेटीतील १,०००/- रुपयाची रोख रक्कम घरफोडी चोरी करुन गेला आहे.

सदर गुन्हा हा मंदिर चोरीचा गंभीर स्वरुपाचा असल्याने मा.वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे नमुद गुन्हयाचा तपास सुरु करण्यात आला होता. तपासा दरम्यान गुन्हयाच्या घटनास्थळाला भेट दिली. तपासा दरम्यान तांत्रिक विश्लेषणावरुन संशयीत इसमाचा मोबाईल नंबर प्राप्त करुन त्याचे सीडीआर विश्लेषण करुन सदर आरोपीचे नाव व फोटो प्राप्त केला. परंतु सदर आरोपीताचा मोबाईल फोन गुन्हा केल्यापासून बंद असल्याने त्याचे ठावठिकाणांची माहिती मिळून येत नसल्याने खास बातमीदाराचे मदतीने सदरचा आरोपी अंबरनाथ जि.ठाणे येथे असल्याची माहिती प्राप्त केली. त्यानंतर लागलीच एक पथक तयार करुन संशयीत आरोपीचे राहते घराचे परिसरात जाऊन सापळा रचून शिताफिने त्यास ताब्यात घेण्यात आले. त्यास ताब्यात घेऊन त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव शाहनुर अख्तर हुसैन खान, वय २३ वर्षे, रा. अंबरनाथ जि.ठाणे असे सांगितले. तसेच त्यास गुन्हयाचे अनुषंगाने अधिक विचारपुस केली असता सदरचा गुन्हा हा त्यानेच केला असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास वर नमुद गुन्हयात दि.१०/०८/२०२४ रोजी अटक करण्यात आली आहे. अशा प्रकारे मंदिरचोरी सारखा गंभीर गुन्हयाची उकल करण्यात भाईंदर पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण कक्षास यश आले आहे. सदर आरोपी हा सराईत गुन्हेगार असून यापुर्वी त्याचेविरुध्द भाईंदर पोलीस ठाणे गु.रजि.नं. ५११/२०२२ भा.द.वि.सं. कलम ३८० प्रमाणे मंदिर चोरीचा गुन्हा दाखल आहे. अटक आरोपी हा सध्या न्यायालयीन कस्टडीमध्ये असुन नमुद गुन्हयाचा पुढील तपास सहा.पोलीस निरीक्षक माणिकराव कतुरे हे करीत आहे.

सदरची कामगिरी श्री. मधुकर पांडे, पोलीस आयुक्त, मि.भा.व.वि पोलीस आयुक्तालय, दत्तात्रय शिंदे सो, अपर पोलीस आयुक्त, प्रकाश गायकवाड सो, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०१, दिपाली खन्ना, सहायक पोलीस आयुक्त, भाईंदर विभाग, विवेक सोनवणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, भाईंदर

पोलीस ठाणे, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहायक पोलीस निरीक्षक श्री. माणिकराव कतुरे, पोउनि/प्रसाद गोवले, पोहवा/रविंद्र भालेराव, राजेश श्रीवास्तव, के.पी. पवार, के.आर. पवार, सुशिल पवार, पोना/रामनाथ शिंदे पोशि/संजय चव्हाण, सलमान पटवे, राहुल काटकर यांनी केलेली आहे.




**--------------0000-------------**